This question paper contains **3** printed pages]

# B—51—2017

## FACULTY OF ARTS/COMMERCE/SCIENCE

## B.A./B.Com./B.Sc. (Second Year) (Third Semester) EXAMINATION

## OCTOBER/NOVEMBER, 2017

MARATHI (S.L.)

(साहित्यधारा भाग-I)

(MCQ & Theory)

**(Tuesday, 10-10-2017)** **Time : 2.00 p.m. to 4.00 p.m.**

*Time*—2 *Hours* *Maximum Marks*—40

*N.B.* :— (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**MCQ**

1. खालील वस्तुनिष्ठ प्रश्न सोडवा : 10

(*i*) भिक्षुकी करावी आणि निर्लज्जपणाने दुसऱ्याचे दारीं उभें राहावें, त्यापेक्षां धंदा करून वेळ आणि आपली .................................. उपयोगास लाऊन पोटें भरावीं तें बरें नाहीं काय ?

(*a*) युक्ती (*b*) शक्ती

(*c*) बुद्धी (*d*) मती

(*ii*) हा राजा (शककर्ता) झाल्यापासून स्त्रियांना .................................. देऊन त्यांची मनें नेहमीं सर्व मानसिक व व्यवहारिक प्रसंगांत धैर्यानें राहण्यास पुष्कळ तऱ्हेनें बळकट झालीं आहेत.

(*a*) विद्यादान (*b*) ज्ञानदान

(*c*) धनदान (*d*) अन्नदान

(*iii*) 'शिवाजी कोण होता' या ग्रंथाचे लेखक खालीलपैकी कोण आहेत ?

(*a*) दिवाकर (*b*) बाबा भांड

(*c*) कॉ. गोविंद पानसरे (*d*) भारत काळे

P.T.O.

B2AB85BB697EEDC5BBF8B984CE239AC1

(*iv*) "काय करणार ? कुणबटाचं लेकरू दुसरं काय करणार सर ? ह्ये नव्हं का भाजीपाला विकतोय" हे उद्‌गार कोणी काढले आहेत ?

(*a*) सिरपती (*b*) सीताराम

(*c*) राजाराम (*d*) यशवंत

(*v*) 'साडेसत्रावा महापुरुष' हा विनोदी कथासंग्रह .................................. यांचा आहे.

(*a*) मुकुंद टाकसाळे (*b*) भारत काळे

(*c*) भास्कर चंदनशिव (*d*) बाबा भांड

(*vi*) 'ओलें मूळ भेदी खडकाचें अंग।
आभ्यासासी सांग कार्यसिद्धि॥'
हा अभंग कोणत्या संताचा आहे.

(*a*) संत चोखामेळा (*b*) संत सावतामाळी

(*c*) संत तुकाराम (*d*) संत नामदेव

(*vii*) '.................................. उद्योगाने रोग लया जाती॥
प्रकृती ती होती बळकटा॥'

(*a*) नित्य (*b*) सत्य

(*c*) असत्य (*d*) व्रत

(*viii*) 'राणीचा बाग' हा बालकवितासंग्रह .................................. यांचा आहे.

(*a*) विंदा करंदीकर (*b*) शरश्चंद्र मुक्तिबोध

(*c*) ना.गो. नांदापूरकर (*d*) वामन पंडित

(*ix*) जाहिरातीच्या महत्त्वाचा विचार केला तर .................................. दृष्टीने जाहिरातीमुळे उत्पादित वस्तू किंवा सेवा यांना मागणी वाढते.

(*a*) वितरकांच्या (*b*) ग्राहकांच्या

(*c*) व्यापाऱ्यांच्या (*d*) उत्पादकांच्या

(*x*) नामांच्या व सर्वनामांच्या .................................. सामान्यरूपांवर विभक्तिप्रत्यय व शब्दयोगी अव्यय लावताना अनुस्वार द्यावा.

(*a*) एकवचनी (*b*) अनेकवचनी

(*c*) बहुवचनी (*d*) यापैकी नाही

## Theory

2. खालीलपैकी कोणताही **एक** प्रश्न सोडवा : 10

(*i*) बाबा भांड यांनी सयाजीराव गायकवाड यांच्या लोककल्याणकारी व्यक्तिमत्त्वावर कसा प्रकाश टाकला आहे ? ते स्पष्ट करा.

(*ii*) संयुक्त कुटुंबाच्या विभक्तीकरणातून निर्माण होणारा सत्तासंघर्ष 'वाटणी' मधून लेखकाने कसा चित्रित केला आहे ?

3. खालीलपैकी कोणताही **एक** प्रश्न सोडवा : 10

(*i*) सौंदर्यवतीच्या मोहक लावण्याचे मनोवेधक वर्णन शाहीर रामजोशी यांनी कसे केले आहे ? ते लिहा.

(*ii*) आत्मकेंद्री वृत्तीने जीवन जगणाऱ्या माणसांच्या आयुष्याच्या जमाखर्चात आलेला रितेपणा कवीने कसा अधोरेखित केला आहे ? ते स्पष्ट करा.

4. खालीलपैकी कोणताही **एक** प्रश्न सोडवा : 10

(*i*) आकाशवाणी प्रसारमाध्यमातील जाहिरात लेखनाचे स्वरूप स्पष्ट करा.

(*ii*) मराठी प्रमाणलेखनाचे ऱ्हस्व-दीर्घ विषयक नियम लिहा.



B2AB85BB697EEDC5BBF8B984CE239AC1